**नियमीत दिवाणी दावा क्र. ५०/२०२५**
**मधील अर्ज निशाणी क्र.३१ खालील आदेश**
**(CNR- MHWS050002972025)**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी, तहसिलदार मंगरुळपीर यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मंगरुळपीर यांना दि. १६.६.२०२५ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास प्रतिवादी क्र. ३ यांच्यातर्फे सहा.सरकारी वकील, प्रतिवादी क्र. ४ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. वादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एन.एम. मुळे आणि प्रतिवादी क्र. ३ तर्फे सहा.सरकारी वकील श्री. जी.डी. गंगावणे आणि प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. एस.आर. जाखोटीया यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दाखल करु इच्छित असलेली तहसिलदार मंगरुळपीर यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मंगरुळपीर यांना दि. १६.६.२०२५ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :–**

३. वादी यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र.५ दाखल केलेला आहे व तो अर्ज न्यायप्रविष्ट आहे. वादी हे त्या तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार मंगरुळपीर यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मंगरुळपीर यांना दि. १६.६.२०२५ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत दाखल करु इच्छीत आहे.

तरी, सदर छायांकीत प्रत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट प्रतिवादी क्र. ३ यांच्यातर्फे सहा. सरकारी वकील आणि प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत छायांकीत प्रत ही या दाव्याशी कशा रितीने संबंध्द (relevant) आहे हे वादींनी स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा जाहिर ठरावासाठी आणि कायम मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींतर्फे तात्पुरता मनाई चा अर्ज निशाणी क्र. ५ दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे. वादी हे तहसिलदार मंगरुळपीर यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मंगरुळपीर यांना दि. १६.६.२०२५ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकीत प्रत दाखल करु इच्छीत आहे. सदर छायांकीत प्रत अभिलेखावर आली तर वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र. ५ गुणदोषावर निकाली काढण्यास ती छायांकीत प्रत उपयुक्त होवू शकते. त्यामुळे वादी यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर उपरोक्त दस्त अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि वादी यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. ३१ मंजुर करण्यात येत आहे आणि वादी यांना उपरोक्त छायांकीत प्रत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.06.17 16:20:56 +0530

स्थळ : मंगरुळपीर

दिनांक : १७.०६.२०२५.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 17/6/2025 |
| Judgment signed by the P.O. on | : | 17/6/2025 |
| Judgment uploaded on | : | 17/6/2025 |